अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 14 ऑगस्ट 2025 | वर्ष 10 वे | अंक 54 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## खोट्या तक्रारींमुळे अनेकजण रोजगारापासून वंचित

### वन हक्क समितीचा पत्र परिषदेत आरोप



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुका अंतर्गत कार्यरत विविध वनहक्क समितीच्या विरूध्द काही असामाजिक तत्त्वांनी भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे केलेले आरोप बिनबुडाचे व राजकीयदृष्ट्या प्रेरीत असल्याचे स्पष्टीकरण वन हक्क समिती चोरटीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्र परिषदेत केले. निरंतर खोट्या तक्रारीमुळे मे-२०२५ पासून वन हक्क समितीच्या माध्यमातून सुरू असणारे मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड व तत्सम कामे पूर्णत: बंद आहेत. परिणामी, २६ गावांतील ग्रामस्थांना रोजगारापासून वंचित राहावे लागत आहे. खोट्या तक्रारी करणाऱ्यांविरूध्द तात्काळ कारवाई करण्याची मागणी वन हक्क समितीने केली आहे.

चोरटी येथील संयुक्त व्यवस्थापन समितीला २५ लाखाचा शासकीय निधी प्राप्त झाला. परंतु अध्यक्षाने त्या संबंधात कोणताही हिशोब दिला नाही. वारंवार विचारणा करूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. याबाबत प्रशासनाने अध्यक्षावर उचित कारवाई केली पाहिजे. चोरटी येथील वन हक्क समितीचे माजी अध्यक्ष मोरेश्वर उईके यांनी मनमानी कारभार केल्यामुळे त्यांना ग्रामसभेने पदावरून हटविले व त्या जागी उद्धव कोडवते यांची नियुक्ती केली. त्यांच्या नेतृत्वात वन हक्क समितीचे कार्य व्यवस्थित सुरू आहे. परंतु या समितीवर भ्रष्टाचाराचे खोटे आरोप करण्यात आले, ही दुर्दैवी बाब आहे. सामाजिक अंकेक्षणामध्ये काही त्रुटी आढळल्या म्हणजे भ्रष्टाचार होत नाही. त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. तालुक्यात वन हक्क प्राप्त क्षेत्रात ३,१२,४०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे ५,६२,३२० दिवस रोजगाराची निर्मिती झाली आहे.

वन हक्क समितीची मार्गदर्शक संस्था राधा ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून मनरेगाची कामे व्यवस्थित सुरू असतात. त्यातून गावात सुख, समृध्दी व शांती नांदत आहे. राधा ऑर्गनायझेशनची नियुक्ती योग्य असल्याचे उपस्थितांनी सांगितले. पत्र परिषदेत उध्दवजी कोडवते, श्रीराम राऊत, मारोती रामटेके, बाळकृष्ण मेश्राम, विनोद राऊत, अशोक राऊत, लता पारधी, दिलीप राऊत, रामेश्वरी ठाकरे, आशा चंदनखेडे उपस्थित होते.

## अल्पवयीन मतिमंद मुलीवर लैंगिक अत्याचार, आरोपी अटकेत

### ब्रम्हपुरी तालुक्यातील सोंदरी येथील घटना, आरोपीला तीन दिवसाची पोलीस कोठडी



ब्रम्हपुरी/का.प्र.

१३ वर्षीय अल्पवयीन मतिमंद मुलीवर नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. आरोपी हा सोंदरी येथील रहिवासी असून त्याचेविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम ६४/(२)(M), ६४/(२F), ६५ (1), दिव्यांग अधिकार अधिनियम कलम ९२ (ड) तथा पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

माणूसकीला काळीमा फासणाऱ्या ह्या घटनेने दिव्यांगाच्या तथा मतिमंद महिलेच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मतिमंद मुलगी समाजात सुरक्षित नसेल तर ही समाजाकरीता लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल.

पोलीस सुत्राने दिलेल्या माहितीनुसार पिडीत अल्पवयीन मतिमंद मुलगी ही वडसा येथील मतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळेत शिकत आहे. स्वगावी असतांना आरोपी तिच्या मागावर असायचा. आरोपीने मागील दीड वर्षापासून पिडीतेवर लैंगिक अत्याचार केला. यातून ती गर्भवती असल्याची बाब वैद्यकीय तपासणीतून समोर आली आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक शीतल खोब्रागडे करीत आहे.

जल है तो कल है...






# संपादकीय...

## ‘ए आय’चा बागुलबुवा

राजीव गांधी पंतप्रधानपदी आरूड झाल्यानंतर त्यांनी भारतात संगणक आणि दूरसंचार क्रांतीचा पाया घातला, त्यावेळी संगणक देशातील नोकऱ्या खाऊन टाकेल, अशी भीती वाटणारा एक मोठा वर्ग होता. भाजपनेही त्याला आपला विरोध दर्शवला होता. विरोधासाठी आंदोलनेही झाली. पण काळाच्या पोटात काही भलतेच दडले होते. संगणकाला होणारा विरोध तीव्रपणे जाणवेपर्यंत संगणकाने भारतातील आपले स्थान पक्के केले. जे विरोध करत होते त्यांनीही संगणक वापरायला सुरुवात कधी केली हे त्यांनाही कळले नाही. आजमितीस संगणक नको, असे कोण म्हणेल? जेव्हा जेव्हा देशात नवे तंत्रज्ञान येते, तेव्हा ते आत्मसात करण्याऐवजी त्याला विरोध करण्याचा पवित्रा जनतेकडून घेतला जातो. कारण ज्याचे ज्ञान नसते ते तंत्रज्ञान आपले अस्तित्व मिटवून टाकेल, अशी निरर्थक भीती सर्वांना वाटत असते. हे प्रत्येक क्षेत्रात घडते. चाळीस वर्षांपूर्वी मुंबई महापालिकेने यांत्रिक झाडू आणण्याचे ठरवले तेव्हाही सफाई कामगारांच्या संघटनेने त्याला तीव्र विरोध केला होता; मात्र आज तेच सफाई कर्मचारी त्याच यंत्रांच्या सहाय्याने कचरा उचलत आहेत. त्यांचे काम पूर्वीच्या तुलनेत अधिक सोपे झाले आहे.

सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग सुरू झाले असताना काही जणांना हे तंत्रज्ञान बेरोजगारी वाढवेल का, अशी भीती भेडसावत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखे कार्य करण्यास भाग पाडणे, यात तर्क करणे, शिकणे, समस्या सोडवणे यासारख्या बाबींचा समावेश आहे. एआय प्रणाली जटिल समस्या सोडवण्यासाठी तर्क आणि विश्लेषण वापरू शकते. मानवी भाषेचा अर्थ लावू शकते आणि संवाद साधू शकते. भाषांतर करण्यापासून ते सेल्फ ड्रायव्हिंग कारमध्येही याचा वापर होतो. बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रांमध्ये फसवणूक शोधण्यासाठीही ते कामी येते. एआय हा वेगाने आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होत आहे. आपल्या जगण्याच्या, काम करण्याच्या, शिकण्याच्या आणि विचार करण्याच्या पद्धतीत क्रांतिकारी बदल घडवून आणत आहे. ऑनलाईन खरेदीपासून मनोरंजन क्षेत्रातही एआय सर्वत्र हजर आहे. भारत एआय–अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, आपल्याला ते कौशल्य म्हणजेच एआय समजून घेणे आवश्यक झाले आहे. आज, एआयची शक्ती ही शेतीपासून शिक्षणापर्यंत, वित्तपुरवठापर्यंत प्रत्येक क्षेत्रात बदल घडवून आणत आहे. भारतात, एआय–आधारित सेन्सर्स आणि ड्रोनद्वारे पिकांचे निरीक्षण आणि व्यवस्थापन केले जात आहे. परिणामी शेती उत्पादन वाढते आहे आणि संसाधनांची बचत होत आहे. आरोग्याच्या क्षेत्रात एआय आता मधुमेहासारखे आजार ओळखण्याचे अधिक अचूक मार्ग शोधत आहे. एआय–आधारित तंत्रज्ञानाच्या मदतीने एक्स–एमआरआयचा अर्थ लावून स्टार्टअप्स आरोग्यसेवांची पोहोच वाढवत आहेत. किरकोळ विक्री, वाहतूक, उत्पादन यासह प्रत्येक क्षेत्रात एआय–आधारित तंत्रज्ञान पसरत आहे. नॅसकॉमच्या मते, एआय धोरणात्मकरीत्या स्वीकारले गेले तर ते २०२५ पर्यंत भारताच्या जीडीपीमध्ये ५०० अब्ज डॉलरचे योगदान देऊ शकते. एआयबद्दल सामान्य धारणा अशी आहे की ते सर्व व्यवस्था ताब्यात घेईल, मात्र एआय नवीन नोकऱ्याही मोठ्या प्रमाणावर निर्माण करत आहे, याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एआयद्वारे नियमित कामे स्वयंचलित केली जातील, परंतु एआय ट्रेनर, मशीन डेव्हलपर, डेटा ॲनोटेटर असे अनेक नवीन व्यवसायही उदयास आले आहेत. सध्याच्या नोकऱ्या करत असलेल्यांना याठिकाणी अधिक उत्तम पर्याय मिळू शकतो. सरकारने सुरू केलेला ‘इंडिया एआय’ कार्यक्रम आणि उद्योगांसोबत भागीदारी देशाची एआय क्षमता निर्माण करण्यास आणि वाढवण्यास मदत करत आहे आणि संबंधित प्रशिक्षण देशभरात वेगाने वाढत आहे. बंगळुरू, हैदराबाद आणि पुणे यासारखी शहरे एआय हब म्हणून उदयास येत आहेत, परंतु आपण त्याकडे केवळ आशावादाने पाहिले पाहिजे. एआय विशेषत: बीपीओ, ग्राहक सेवा, मूलभूत कोडिंग आणि उत्पादन क्षेत्रातील अनेक विद्यमान नोकऱ्या कमी करू शकेल. मॅकांझीच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत जगभरात ३० कोटी नोकऱ्या स्वयंचलित केल्या जाऊ शकतात. भारतात, जिथे मोठ्या संख्येने कमी पगाराच्या नोकऱ्यांमध्ये आहेत त्यांच्यासाठी एक गंभीर संकट मानले जात आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे एआयमध्ये आवश्यक असलेली कौशल्ये अद्यापही येथे उपलब्ध नाहीत. म्हणूनच त्याला घाबरण्याऐवजी ते तंत्रज्ञान आत्मसात करण्यातच अधिक हित आहे.

# एलएमबी स्कूलमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे वृक्षारोपण




ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या प्रि–प्रायमरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून वृक्षलागवड ही ॲक्टीविटी राबवली. ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती’, ह्या ओळींमध्ये संतानी वृक्ष व त्यांचे महत्त्व आपल्याला खूप गाळापूर्ण सांगितले. वृक्षामुळेच आपले जीवन शक्य आहे. म्हणूनच प्रत्येकाने एक तरी झाड लावावे. ही काळाची गरज आहे. हीच भावना विद्यार्थ्यांच्या मनात रूजावी व ह्याचे महत्त्व नव्या पिढीला समजावे व त्यांनी आपल्या वंसुधरेला परत सुजलाम सुफलाम करावे. ह्या उद्देशाने शाळेमध्ये वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रि–स्कूल च्या विद्यार्थ्यांनी विविध झाडांची रोपे आपल्या वर्गशिक्षिका बरोबर लावली. वृक्षाची काळजी कशाप्रकारे घेतली जाते हे त्यांना सांगण्यात आले. या प्रसंगी स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वृक्षाचे महत्त्व सांगून जास्त प्रमाणात वृक्ष तोड झाल्याने पर्यावरणावर विपरित परिणाम होत असल्याचे सांगितले. मानवाला विविध आजारांना सामोरे जावे लागत असून यावर वृक्ष लागवड हा एकमेव उपाय असल्याचे प्रतिपादन केले. प्रि–स्कुलच्या शिक्षिका यांच्या उपस्थितीत Plantation Activity हा कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

# सोनेगावच्या नागरिकांचा जीवघेणा प्रवास

ब्रह्मपुरी/का.प्र.

वैनगंगा नदी घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.



गावातील शेतकऱ्यांना शेतावर आवागमन करण्यासाठी जीव मुठीत घेऊन खडतर प्रवास करावा लागत आहे. सध्या स्थितीत हा रस्ता चिखलमय असल्याने नागरिकांना पायदळ जाणे सुद्धा कठीण झाले आहे. असा खडतर प्रवास करतांना एका शेतकऱ्याची बैलबंडी या चिखलमय रस्त्यात फसली. दोन्ही बैलांनी ताकतीनिशी शेवटपर्यंत बैलबंडी काढण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. मात्र अखेर दोन्ही बैल थकले. त्यापैकी एक थकलेला बैल तिथेच चिखलात फसलेल्या अवस्थेत दिसून आला. त्या बैलांला उठविण्यासाठी बैल मालकांचे शर्तीचे प्रयत्न सुरू केले. हा भीषण आणि विदारक प्रसंग ब्रह्मपुरी तालुक्यातील सोनेगाव येथील नदी घाटा कडे जाणाऱ्या रस्त्याचा आहे.

सावलगाव, सोनेगाव ते बोढेगाव शेत शिवारातून गोसीखुर्द धरणाच्या पाण्याचा पुरवठा शेतकऱ्यांच्या शेतींला व्हावा या उद्देशाने मुख्य कालवा केलेला आहे. त्यालाच जोडून लहान कालव्याचा पाट सहा महिन्यापूर्वी रस्त्याच्या मध्यभागी तयार करण्यात आला. मात्र तो काही दिवसातच वाहून गेला. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मातीचा थर बसून असल्याचे दिसते. संबंधित ठेकेदाराने त्या ठिकाणी मुरुमाची व्यवस्था करायला पाहिजे होती. मात्र निव्वळ रस्त्याच्या दोन्ही बाजूने मातीच माती टाकण्यात आल्याने पावसाळ्याच्या दिवसात आवागमन करणाऱ्या शेतकऱ्यांना खडतर परिस्थितीत चिखलमय रस्त्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

यापूर्वी या रस्त्याने मोटार सायकल व सायकलने प्रवास करताना स्लीप होऊन पडल्यामुळे किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्याचे गावातील नागरिकानी आमच्या प्रतिनिधीकडे सांगितले. खरंतर ग्रामपंचायतीने या मागणीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र त्यांचा ढिसाळ कारभारामुळे ही परिस्थिती गावकऱ्यांना अनुभवास मिळत आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी व स्थानिक ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदारावर उचित कारवाई करण्यासाठी पावले उचलावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

## विनोदिनी

एक बार घर के बाहर खेलते–खेलते एक बच्चे ने दो तीन सिक्के निगल लिए तो उसकी मां चिल्लाई कोई मेरे बच्चे को बचाओ...

तभी एक लड़का दौड़ता हुए आया और बच्चे को आढ़ा तिरछा ठोक–पीट कर सिक्के निकाल दिए...

मां : थैंक यू बेटा.. क्या तुम डॉक्टर हो....

लड़का : नहीं जी.. मैं तो बस एक बैंक का लोन रिकव्हरी एजेंट हूं...!!!

## - रक्षाबंधन -





**भावा बहिणीच्या पवित्र नात्याचा सण रक्षाबंधन त्या निमित्य नेवजाबाई हितकारणी उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी येथे राखी मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन तिरंगा राखी अतिशय उत्कृष्टरित्या तयार केल्या. यावेळी टिपलेले छायाचित्र.**

# कुणबी समाज संघर्ष समितीद्वारे खड्डे बुजवा मोहिम



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुका अखिल कुणबी समाज आणि मित्र परिवारातर्फे शनिवार दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी क्रांती दिन आणि रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून नागभीड ते ब्रह्मपुरी राष्ट्रीय महामार्गावर पडलेले मोठे मोठे खड्डे बुजविण्याची मोहीम हाती घेतली. या उपक्रमातून अनेक वाहन चालकांना यापासून दिलासा मिळणार आहे.

ब्रह्मपुरी शहर आरोग्य नगरी आणि शैक्षणिक नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या तालुक्यातून नागरिक विविध कामकाजासाठी ब्रह्मपुरीला येतात. मात्र ब्रह्मपुरीला ये जा करत असतांना राष्ट्रीय महामार्गावर पडलेल्या खड्डयामुळे अपघाताच्या बऱ्याच घटना घडल्या आहेत. सदर खड्डयामुळे दिनांक ८ ऑगस्ट रोजी आमदार विजय वडेट्टीवार यांच्या निवासस्थानासमोरील रोडवर अपघात घडला. त्यामुळे ब्रह्मपुरी तालुका अखिल कुणबी समाज संघर्ष समितीने वेळीच लक्ष केंद्रित करून स्वतः पुढाकार घेत खड्डे बुजवण्याची मोहीम हाती घेतली.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रकाश धोटे, अविनाश राऊत, अनिल दोनाडकर, जगदीश तलमले, राजू उरकुडे, मनोज वझाडे, नोगेश बगमारे, राजेश पारधी, प्रेमलाल धोटे यांच्यासह अखिल कुणबी समाज संघर्ष समितीचे युवक प्रतिनिधी बहुसंख्येने उपस्थित होते.

# आ. वडेट्टीवारांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

### जिल्हा सचिव वासु सोंदरकर, जिल्हा सहसचिव आशिष गोंडाणे, मोहम्मद गाजी पटेल तर शहर सरचिटणीस पदी पराग बनपुरकर यांची नियुक्ती



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या पक्षांतर्गत विविध संघटनात्मक पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या सर्व पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहेत.

यामध्ये चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमीटीच्या सचिवपदी वासु सोंदरकर, जिल्हा सहसचिवपदी ॲड.आशिष गोंडाणे, जिल्हा सहसचिव पदी मोहम्मद गाजी पटेल तर ब्रम्हपूरी शहर सरचिटणीसपदी पराग बनपुरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राज्याचे माजी विरोधी पक्षनेता, विधीमंडळ कॉंग्रेस गटनेते, आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे. कॉंग्रेस पक्षाचे विचार व ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जोमाने कार्य करावे असे आवाहन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतांना तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांनी केले आहे.

नियुक्तीपत्र प्रदान करतांना तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी नगरसेवक मनोज कावळे, शहर कॉंग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, अनुसूचित जाती सेलचे शहराध्यक्ष मुन्ना रामटेके, युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष रवी पारधी, वकार खान, ईनायत खॉ पठाण, ईकबाल जेसानी, प्रकाश खोब्रागडे, लक्ष्मण जिभकाटे, रवि पवार यांसह अन्य कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

# लोकमान्य टिळक विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वितरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक लोकमान्य टिळक उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी येथे दि. ११ ऑगस्ट




२०२५ रोज सोमवारला इयत्ता ५ व ६ वीच्या नवीन प्रवेशीत विद्यार्थ्यांना गणवेष वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतींच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पन करुन झाली. यांप्रसंगी मिडलस्कुलच्या विद्यार्थीनी स्वागत गीत, सुभाषीत, अमृतवचन सादर केले तर राम दलाल याने गणवेशाचे महत्व सांगीतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर होते. तर प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव प्रा. सतीशभाऊ शिनखेडे, डॉ. मुकुल रॉय (आयुर्वेदिक तज्ञ,ब्रम्हपुरी), प्राचार्य विलासजी धोंगडे सर, उपप्राचार्य रवीजी पेशटटीवार, पर्यवेक्षिका प्राजक्ता चिंचाळकर मॅडम, प्रभारी शिक्षक विजय सोनकुसरे सर यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या पाहुण्यांचा परिचय प्राचार्य विलास धोंगडे यांनी करुन दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अतुलभाऊ देशकर यांनी आपल्या मनोगतामध्ये गणवेशाचे महत्व सांगुन विद्यार्थ्यांना कठोर मेहनत करण्यास सांगितले. डॉ. मुकुल रॉय यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी काळजी घेण्याचे सांगून आयुर्वेदाचे महत्व सांगितले. सतीश शिनखेडे यांनी विद्यार्थ्याचा शालेय गणवेश म्हणजे शाळेचा अभिमान आहे, असे सांगून आपले वर्तन गणवेशाप्रमाणे स्वच्छ असले पाहीजे. गणवेशाव्दारे सांघीक भावना निर्माण होते. विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय सोनकुसरे यांनी तर आभार प्रदर्शन विवेक बिटपल्लीवार सर यांनी केले. वंदेमातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पोलीसांना राख्या बांधून वंचिततर्फे रक्षाबंधन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्त्री-पुरुष समानतेच्या पार्श्वभूमीवर महिला भगिनी अबला नाही तर भावांनी या बहिणींचे रक्षण करावे. यासाठी भारतीय संस्कृतीनुसार देशात राखी पौर्णिमा हा सण साजरा केल्या जातो. या सणाचे निमित्याने वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर व महाराष्ट्र प्रदेश महासचिव महिला आघाडीच्या अरुंधतीताई शिरसाट यांच्या आदेशानुसार वंचित बहुजन महिला आघाडी ब्रम्हपुरीच्या वतीने तालुकाध्यक्ष लिलाधर वंजारी यांच्या सुचनेनुसार पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथील कर्मचाऱ्यांना रक्षाबंधन करण्यात आले.

पोलीसांनी महिलांप्रति आपली जबाबदारी व कर्तव्ये यांची जाण राखावी, यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ब्रम्हपुरी तालुका महिला आघाडीच्या सुकेशनी बन्सोड, शारदा घोरमोडे, वैशाली रामटेके, किरण मेश्राम, करुणा मेश्राम, साधना रामटेके, शितल नागदेवते, विश्रांती रामटेके, डॉ. प्रेमलाल मेश्राम, लिलाधर वंजारी, डी.एम. रामटेके, रतन लांडगे आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीत जनसुरक्षा विधेयक विरोधात विशाल आक्रोश मोर्चा संपन्न

## जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी




ब्रह्मपुरी/का.प्र.

जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती ब्रह्मपुरीच्या वतीने ०८ ऑगस्ट २५ रोजी आंदोलन करण्यात आले. आंदोलनात समता सैनिक दल, पत्रकार, वकील, शिक्षक, योजना कर्मचारी, शेतकरी, युवक यांच्यासह बहुजन समाजातील विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हुतात्मा स्मारक येथून मोर्चाची सुरुवात करण्यात आली. नगरपरिषद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना माल्यार्पण करून विशाल मोर्चाची सुरुवात करण्यात आली. जनसुरक्षा विधेयक रद्द करा, शेतकऱ्यांची कर्ज माफी करा, विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती तात्काळ द्या. या प्रमुख मागण्याचे घोषणा देत तसेच 'छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो', 'संविधान जिंदाबाद' अशा घोषणांनी संपूर्ण ब्रम्हपुरी शहर दुमदुमले. विशेष म्हणजे जनसुरक्षा विधायक विरोधात जिल्ह्यात प्रथम आंदोलन ब्रम्हपुरीत करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथून मोर्चाची सुरुवात झाली. सम्राट अशोक चौक, रेणुका माता चौक, मर्दनअली चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, असे मार्गक्रमण करीत मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. या मोर्चाची पार्श्वभूमी आणि सभेचे प्रास्ताविक मोर्चाचे निमंत्रक प्रशांत डांगे यांनी केले. तर कॉ.विनोद झोडगे यांनी जनसुरक्षा विधेयक कसे अन्यायकारक असल्याबद्दल माहिती दिली. या सभेला खेमराज तिडके,जीवन बागडे, डॉ. राजेश कांबळे, अशोक रामटेके, प्रभू लोखंडे, कॉ. महेश कोपुलवार आदींनी सभेला संबोधित केले.

सभेचे संचालन सुधाकर पोपटे तर आभार लिलाधर वंजारी यांनी केले. त्यानंतर महामहीम राज्यपाल महाराष्ट्र शासन यांना तहसीलदार ब्रम्हपुरी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. या विशाल आक्रोश मोर्चा करिता ब्रम्हपुरी तालुक्यातील समता सैनिक दलाचे सैनिक, शेतकरी, नागरिक, महिला, विद्यार्थी हजारोच्या संख्येने उपस्थित होते. पुरोगामी संघटनांनी मोर्चात सहभाग घेतला. मोर्चाच्या यशस्वीतेकरिता डेव्हिड शेंडे, मोंटू पिलारे, विहार मेश्राम, स्वप्नील राऊत यांनी अथक परिश्रम घेतले.

## शहरातील जड वाहन व मोकाट जनावरांची समस्या तात्काळ सोडवा




ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरामध्ये अलीकडे वाढत असलेल्या जड वाहनांच्या अनियंत्रित वाहतुकीमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन धोक्यात आले आहे. ही वाहने शहराच्या मुख्य रस्त्यांवर भरधाव वेगाने कोणत्याही वेळेस फिरत असून यामुळे शाळकरी विद्यार्थी, नागरिक व वृद्ध व्यक्ती यांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावरून जावे लागत आहे.

गडचिरोली येथे नुकत्याच घडलेल्या भीषण अपघातासारखी परिस्थिती ब्रह्मपुरीत निर्माण होऊ नये, म्हणून नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन येथे भरधाव वेगाने होणाऱ्या जड वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी निवेदन सादर करून शहरात जड वाहनांवर वेळेचे बंधन लावण्याची मागणी भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहराच्या वतीने करण्यात आली. शहरातील अनेक रस्त्यांवर दिवसा व रात्रीही मोकाट जनावरे मुक्तपणे वावरताना दिसत असून यामुळे अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. यावर नगरपरिषद व प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

निवेदनात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. जड वाहनांच्या वाहतुकीवर वेळेचे बंधन घालावे, मुख्य रस्त्यांवर व शाळा परिसरात जड वाहनांना प्रवेश बंदी करावी, मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवून त्यांची योग्य व्यवस्था करावी, संभाव्य अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस बंदोबस्त करावा. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने तात्काळ योग्य ती कारवाई करावी, ही भाजपच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी भारतीय जनता पार्टी चे शहर अध्यक्ष प्रा सुयोग बाळबुधे यांच्या नेतृत्वात ब्रह्मपुरी पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक बानबले यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी भारतीय जनता पार्टी चे जिल्हा सचिव साकेत भानारकर, शहराचे महामंत्री मनोज भूपाल, पवन जयस्वाल, युवा मोर्चा चे जिल्हा महामंत्री तनय देशकर, उपाध्यक्ष प्रशांत वसाके, प्रकाश कुथे, रितेश दशमवार, नितीन आंबोरकर, युवा मोर्चा शहर महामंत्री स्वप्नील अलगदेवे उपस्थित होते.

## बसपा तर्फे अण्णाभाऊ साठे जयंती व कार्यकर्ता बैठक



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोज सोमवारला ब्रह्मपुरी येथे बहुजन समाज पार्टी विधानसभा ब्रह्मपुरी द्वारा साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम तथा कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्हा इन्चार्ज महेंद्र मकेश्वर हे प्रमुख मार्गदर्शक तथा अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मार्गदर्शक तथा प्रमुख उपस्थितीमध्ये चंद्रपूर जिल्हाध्यक्ष रत्नाकरजी साठे चंद्रपूर जिल्हाचे प्रभारी तथा ब्रह्मपुरी विधानसभा इन्चार्ज नंदूभाऊ खोब्रागडे चंद्रपूर जिल्हा महासचिव सुभाष पेटकर चंद्रपूर जिल्हा कोषाध्यक्ष मनोहरजी बांबोळे उपस्थित होते.

बैठकीमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती तथा नगरपरिषद या निवडणुकीच्या संदर्भाने तथा संघटन वाढविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. या बैठकीमध्ये काही सक्रिय कार्यकर्त्यांना जबाबदारी देण्यात आली. या बैठकीला विधानसभा प्रभारी हिरामणजी मेश्राम, विधानसभा बीव्हीएफ संयोजक अनिल बारसागडे, विनोद राऊत, मनोज शेंडे, ब्रह्मपुरी तालुका युवक आघाडी अध्यक्ष प्रीतम मेश्राम, ब्रह्मपुरी तालुका विद्यार्थी आघाडी अध्यक्ष संजोग मेश्राम, संजय बिजवे,रामटेके सर, नगरकर साहेब, डॉ. गुरुदास मेश्राम, आत्माराम मेश्राम व विधानसभेतील कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन नंदूभाऊ खोब्रागडे यांनी, प्रास्ताविक मनोहरजी बांबोडे यांनी व आभार प्रदर्शन शहराचे नवनियुक्त अध्यक्ष केवळराम पारधी यांनी केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम ठार

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यात अपघाताची शृंखला दिवसेंदिवस वाढत चालली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वाहन चालक भंग करीत असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहेत. ब्रह्मपुरी आरमोरी रोडवरील बेटाळा फाट्याजवळ अज्ञात वाहनाने दुपारच्या सुमारास दुचाकीला जोरदार धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात दुचाकी स्वार जागीच ठार झाल्याची घटना १० ऑगस्ट २०२५ ला घडली.

प्राप्त माहितीनुसार, ब्रह्मपुरी आरमोरी रोडवरील बेटाळा फाट्याजवळ अज्ञात वाहनाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून दुचाकीस्वारास जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. दुचाकी स्वाराचे नाव अभिमन पंढरी दोनाडकर वय ५५ वर्षे राहणार बरडकिन्ही असल्याचे कळते. ब्रह्मपुरी पोलिसांनी घटनास्थळी भेट देत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथे पाठविला. पुढील तपास ब्रह्मपुरी पोलीस करीत आहेत.

# वन्य प्राण्याच्या हल्ल्यात शेतकरी ठार

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात मानव वन्यजीव संघर्ष शिगेला पोहोचला आहे. मानव वन्यजीव संघर्षामध्ये अनेक नागरिक गंभीर जखमी झाले, तर काहींना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे ब्रह्मपुरी तालुक्यात मानव वन्यजीव संघर्ष ही नित्याचीच बाब झाली आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील कुडेसावली येथील एक शेतकरी वन्य प्राण्याच्या हल्ल्यात ठार झाल्याची घटना ११ ऑगस्ट २०२५ ला सकाळी ११.३० वाजता दरम्यान घडली आहे. सदर घटना सायंकाळी ५ वाजता दरम्यान उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार, ब्रह्मपुरी तालुक्यातील कुडेसावली येथील रहिवासी घनश्याम गोविंदा उंदीरवाडे वय ५१ वर्ष हे पद्मापूर बीट परिसरात बल्लारपूर येथे त्यांची शेती आहे. उंदीरवाडे हे आपल्या शेतात गट क्रमांक ७२ येथे नेहमीप्रमाणे कामाकरिता गेले होते. मात्र सायंकाळ होऊन परत आले नाही. शेतातून घनश्याम उंदीरवाडे परत न आल्याने त्याचा शोध गावकरी व वन विभाग कर्मचाऱ्यांच्या वतीने घेण्यात आला. त्यावेळी त्यांचा मृतदेह शेत शिवारा पासून १०० मीटर अंतरावर दिसून आला. वन्य प्राण्यांने त्यांच्यावर सकाळी ११ वाजता च्या सुमारास अचानक हल्ला चढविला. वन्य प्राण्याने केलेल्या हल्ल्यात घनश्याम गोविंदा उंदीरवाडे हे ठार झाले. सदर घटना दक्षिण वनपरिक्षेत्रात घडली आहे. मृतदेह मिळताच पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथे पाठविला. दक्षिण वनपरिक्षेत्र अधिकारी सोडवले यांनी मृतकाच्या कुटुंबियांना तात्काळ २५ हजारांची आर्थिक मदत केली. तसेच इतर मदत लवकरात लवकर करण्याचे आश्वासन दिले.

वन विभागाच्या वतीने सदर परिसरात वन्य प्राण्यांवर पाळत ठेवण्यासाठी कॅमेरे ट्रॅप लावण्याचे काम करण्यात येत असल्याची माहिती दक्षिण वनपरिक्षेत्र अधिकारी सोंडवले यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली. काही दिवसांपूर्वी पूर्वी रामपुरी जंगल शिवारात वाघाने हल्ला करून गुराख्याला जखमी केल्याची घटना घडली होती, हे विशेष. सदर मानव वन्य प्राणी संघर्ष समस्या सोडविण्यासाठी वन विभागाने पावले उचलण्याची नागरिकांकडून मागणी होत आहे.

**जल है तो कल है...**

# जि.प. शाळा चिचगांव येथे राखी प्रदर्शनी व विक्री



ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिचगाव पंचायत समिती ब्रह्मपुरी येथील मीना-राजू मंच तर्फे रक्षाबंधनाचे औचित्य साधून राखी निर्मितीचा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक व्हावे व त्यांचा उत्साह वाढावा यासाठी समस्त गावकऱ्यांसाठी विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या राख्यांची विक्री व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.

प्रदर्शनीचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक प्रल्हाद बालपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. विविध प्रकारचे मणी, धागे, रंगीबेरंगी लोकर, काही टाकाऊ वस्तूंचा कुशलतेने वापर करून स्वत:च्या कल्पकतेने विद्यार्थ्यांनी १२४ राख्यांची निर्मिती केली. बाजारात मिळणाऱ्या व्यावसायिक राख्यांसारख्या राख्या विद्यार्थ्यांनी निर्माण केल्यामुळे या राख्यांची गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे खरेदी केली.

शहरात मिळणाऱ्या फॅन्सी राख्या अगदी कमी किमतीत उपलब्ध व्हाव्यात तसेच राख्या निर्मिती चे तंत्र सर्वांना अवगत व्हावे आणि भविष्यात उद्योजक निर्माण व्हावेत हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे मत कार्यक्रमाचे संयोजक विनोद मदनकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक प्रधान सर, रडके सर, कु.कोलते मॅडम यांनी सहकार्य केले.

# चौगानच्या भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेस प्रवेश

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रात आमदार विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणात विकासकामे पार पडली आहेत. त्यामुळे विकासकामांनी प्रभावित होऊन आमदार विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून चौगान येथील भाजपच्या अनेक सक्रिय कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



सदर पक्षप्रवेश विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर, शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, जिल्हा काँग्रेस सहसचिव आशिष गोंडाणे, श्रीहरी देवगडे, उमेश भुरके यांची उपस्थिती होती.

पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये पुरुषोत्तम नन्नावरे, संजय नन्नावरे, दीपक नन्नावरे, प्रभाकर नन्नावरे, नंदकिशोर नन्नावरे, शाळिकराम धरत, प्रमोद मैंद, सुभाष खरकाटे, मुखरू दवे, युवराज आरोटे यांचा समावेश आहे.

❀❀❀❀❀❀❀

## - निधन वार्ता -



डॉ. पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील प्राचार्या शारदाताई भोजराज धोटे यांचे सासरे विश्वनाथ धोटे यांचे मंगळवार, दि.१२/८/२०२५ ला वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते. त्यांच्यावर दि. १३/८/२०२५ ला सकाळी भूतीनाला स्मशानभुमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सावित्री महिला प्रबोधन बचत गटाचे उत्तम कार्य

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथील सावित्री महिला प्रबोधन बचत गट याद्वारे नियमित सामाजिक कार्यक्रम घेतले जातात. नुकतेच १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने ३ ऑगस्ट या दिवशी आयोजित्य साधून अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी सावित्री महिला बचत गटाचे द्वारे मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन बचत गटाच्या पुढारी सविताताई धापट यांनी केले. कार्यक्रमामध्ये प्रीतीताई नंदेश्वर, प्रीति रामटेके व मोटघरे मॅडम यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून उपस्थितांना मार्गदर्शन केले. भगवान गौतम बुद्ध यांच्या बौद्ध धर्मातील वर्षावास काय आहे. या बाबतीत विस्तृत माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमाला गटातील मंडळाच्या महिला, बालके आणि नागरिक उपस्थित होते.


आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
नियमित ऑनलाईन अंकाकरीता संपर्क करा

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: अंक व जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३१५


**झाडे लावा, झाडे जगवा...**

**... QUOTES ...**

**"Dreams are not those which comes while we are sleeping, but dreams are those when you don't sleep before fulfilling them."**
**- Dr. Abdul Kalam**

**चारोळी**

श्रध्दांजलीत त्याच्या दानीपणाचे
वक्ता खुपच गुणगान करतो...
मोबदल्यात घेतलेले कर्ज,
ॲडव्हान्स पेमेंट समजतो...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धांमध्ये सुयश

## मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा, एकलव्य सामान्य ज्ञान स्पर्धा तसेच भारत टॅलेंट सर्च परीक्षेत बाजी



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये बुधवार दि. ६ ऑगष्ट २०२५ ला मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परिक्षा, एकलव्य सामान्य ज्ञान परिक्षा तसेच भारत टॅलेंट सर्च परिक्षा स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास होण्याकरिता विविध स्पर्धा परिक्षांचे आयोजन स्कुलमध्ये करण्यात येते. या स्पर्धा परिक्षेत बहुतांश विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले.

मंथन राज्यस्तरीय ज्ञान परिक्षेत विभागीय स्तरावरील इयत्ता २ री तील अंभृणी बोडाणे या विद्यार्थीनीने डिव्हीजन रॅंक २, इयत्ता ४ थी तील समर तितरमारे डिव्हीजन रॅंक ४ तसेच रूही वट वर्ग ४ थी तील डिव्हीजन रॅंक ३ तसेच इयत्ता ६ वी तील परिस परशुरामकर डिव्हीजन रॅंक १ ह्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र आणि ट्राफी देऊन गौरव करण्यात आला.

तसेच केंद्रीय पातळीवरील विद्यार्थी शरव प्रधान २ री सेंटर रॅंक १, माही वंजारी ४ थी सेंटर रॅंक २, स्मिथ कसारे ४ थी सेंटर रॅंक १, युगलकिशोर साहारे ५ वी सेंटर रॅंक १, शौर्या पुस्तोडे ८ वी सेंटर रॅंक २, वृशाली साहारे ८ वी सेंटर रॅंक १, मृण्मयी राऊत ९ वी सेंटर रॅंक १ ह्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम करून यश संपादन केले.

त्याचप्रमाणे एकलव्य ज्ञानवर्धीनी सामान्य ज्ञान परिक्षेत इयत्ता ७ वी ची विद्यार्थीनी लावण्या ललितकुमार लाडे हिने यश संपादन केले. तसेच भारत टॅलेंट सर्च परिक्षेत इयत्ता ५ वी विद्यार्थीनी आसावरी विनोद बागडे हिने भरारी घेतली.

विजेत्या सर्व विद्यार्थ्यांना कौतुक करून त्यांना शाळेचे प्राचार्य कुरेशी सर तसेच शाळेच्या उपप्राचार्य राठी मॅडम, पर्यवेक्षिका झोडे मॅडम व सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# निलज येथील मृतकाच्या कुटूंबाला कुणबी समाज संघर्ष समितीकडून मदत



ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील निलज येथील आकाश ज्ञानेश्वर बुराडे यांचा दिनांक ९ ऑगस्ट रोजी आरमोरी येथील लालानी यांच्या मालकीच्या हिरो शोरूमच्या दुकानात मेकॅनिक म्हणून काम करीत होता. आकाश बुराडे यांच्या अंगावर बिल्डिंगची भिंत कोसळून अपघाती मृत्यू झाला. ही बाब अखिल कुणबी समाज संघर्ष समितीच्या लक्षात येताच रविवार दिनांक १० ऑगस्ट रोजी निलज येथील आकाश बुराडे यांच्या कुटुंबियाची सांत्वनपर भेट घेत त्यांच्या पत्नीला समितीच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली.

यावेळी अखिल कुणबी समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश धोटे, नानाजी तुपट, अविनाश राऊत, अनिल दोनाडकर, प्रेमलाल धोटे, सुभाष नाकतोडे, मनोज वझाडे, संदीप तुपट, विनोद राऊत, नोगेश बगमारे, जगदीश तलमले, अशोक पिलारे, अमित सहारे,गोकुल कार, राजेश पारधी, राजू उरकुडे, मोनू माकडे, निखिल खरकाटे, अंकित सोंदरकर, प्रणय सोंदरकर, प्रशांत तोडकर, प्रद्युम्य सहारे, स्वप्निल वानखेडे, नयन शेलोटे. अक्षय तोंडरे, चेतन सोंदरकर यांच्यासह समितीचे सदस्य व गावकरी उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीत घराच्या छतावर ड्रॅगन फ्रुट शेती

## केवळ १८ महिन्यात झाडांना फळधारणा, मेहनतीला यश



ब्रह्मपुरी/का.प्र.

मनात इच्छा असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे ब्रह्मपुरीतील कल्पना खेमराज तिवाडे यांनी प्रत्यक्षात सिद्ध करून दाखवले आहे. त्यांनी आपल्या घराच्या छतावर ड्रॅगन फ्रुट (Dragon Fruit) या उष्णकटिबंधीय फळाची यशस्वी लागवड केली असून, हा अनोखा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

ड्रॅगन फ्रुट मूळचे दक्षिण मेक्सिको, मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील फळ असून, १९९० च्या दशकात ते आशियातील उष्णकटिबंधीय देशांमध्ये व्यावसायिक लागवडीसाठी आले. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरातसह भारतातील अनेक राज्यांत त्याची लागवड वाढत आहे. कल्पना तिवाडे यांनी दोन वर्षांपूर्वी ऑनलाइन ॲपद्वारे ड्रॅगन फ्रुटची कलमे मागवली. छतावर बकेट व टोपल्यांमध्ये तणस माती व शेणखत भरून त्यांनी रोपांची लागवड केली. उष्णकटिबंधीय हवामानात वाढणाऱ्या या झाडांना पाणी कमी लागते. योग्य निगा राखल्यामुळे फक्त १८ महिन्यांत झाडांना फळे लागायला सुरुवात झाली.

कल्पना तिवाडे यांनी आपल्या छतावर केवळ ड्रॅगन फ्रुटच नाही, तर रसायनमुक्त भेंडी, पडवळ यांचीदेखील लागवड केली आहे. घराच्या अंगणात ॲव्होकॅडो, चिकू, आंबा, सीताफळ अशी फळझाडेदेखील त्यांनी लावली असून, त्यांना भरघोस फळे लागतात. ब्रह्मपुरी बाजारात अजूनही ड्रॅगन फ्रुट निवडक विक्रेत्यांकडेच उपलब्ध असते, अशा परिस्थितीत छतावर केलेली ही शेती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या छतावरील हिरवाई आणि फुललेल्या ड्रॅगन फ्रुटचे सौंदर्य पाहण्यासाठी अनेकजण त्यांच्या घरी भेट देत आहेत.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404